Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 5.3
ISSN No. 2456-1665

# महात्मा फुले यांचे बहुजन शिक्षणाविषयक योगदान

**प्रा. डॉ. संजय उत्तम बेंद्रे**

वसंतराव नाईक  कला, वाणिज्य महाविद्यालय आणि

बॅ.ए.आर.अंतुले सायन्स महाविद्यालय, म्हसळा

जि.रायगड. ४०२१०५

फोन.नं. ९४२११६६९९९,  ८४२१६५४४०२

**प्रस्तावना :-**

इ.स.१८२७ मध्ये महात्मा फुले यांचा जन्म माळी कुटुंबात झाला. वयाच्या ७ व्या वर्षी महात्मा फुलेंच्या शिक्षणास प्रारंभ झाला. पण शिक्षण घेताना अनेक अडचणींना तोंड दयावे लागले माळ्याचे पोर शिकतय हे समजताच उच्च वर्ग मंडळींनी गोविंदरावांना म्हणजेच महात्मा फुलेंच्या वडिलांना धर्म बुडवेगीरीचा आरोप लावला. कारण शिक्षणाचा अधिकार उच्च वर्गीय लोकांचा आहे.  त्यातच कोणीतरी त्यांच्या वडिलांचे म्हणजे गोविंदरावांचे कान भरले की तुम्हांला शिकून काय उपयोग, काय फायदा होणार नाही. पुढे तो शेतीतीलही कामे करणार नाही. शिक्षणाने माणूस धर्मद्रोही होतो नालायक होतो. शेवटी महात्मा फुल्यांना शाळेतून काढून शेतीच्या कामाला जुंपले गेले. वयाच्या १३ व्या वर्षी महात्मा फुल्यांचा विवाह सावित्रीबाईशी झाला. पण शिक्षणाची आवड कमी झाली नाही. शेवटी गोविंदरावांचे शेजारी गफूरबेगमुन्सी व ख्रिश्चन लिजिट साहेब या दोघांनी ज्योतिबाला शिक्षण देणे कसे गरजेचे आहे हे गोविंदरावांनापटवून दिले. १८४१ मध्ये त्यांना स्कॉटीश मिशनरी शाळेत घातले व त्यांचे पुढील शिक्षण चालू झाले.

**ज्योतिबांचा बहुजन उद्धारांकडे कल :-**

महात्मा फुले बहुजनांच्या उद्धारासाठी पुढे कसे आले हा एक कुतूहलाचा विषय आहे. त्याचे झाले असे एक ब्राह्मण मित्राचे लग्नाचे त्यांना आमंत्रण आले. त्यानुसार ज्योतिबा लग्नसमारंभात सहभागी झाले त्या नंतर नवरा- नवरीची वरात निघाली त्या वरातीतही सहभागी झाले. त्यावेळे एक ब्राह्मण व्यक्तीने ज्योतिबाला आपण कोण असे विचारले असता,  मी "माळ्याचा" अशी ओळख करून देताच तो ब्राह्मण व्यक्ती अंगावर येवून "अरे शूद्रा तू जाती – पातीची सगळी बंधने धुडकावून लावलीस" असे म्हणून त्यांना वारातीमधूनहाकलून देण्यात आले. हा अपमान ज्योतिबांच्या जिव्हारी लागला. ज्योतिबा भयंकर संतापले होते व वडिलांपुढे रडू लागले व विचारू लागले की,ब्राह्माणांचे वर्चस्व कशात आहे त्यालाच प्रतिबंध करण्याचा विचार करू लागले.

**महात्मा फुलेंचे शैक्षणिक विचार :-**

महात्मा फुल्यांना साक्षात्कार झाला होता की, शिक्षण हा माणसाचा तिसरा डोळा आहे शिवाय शिक्षणात ताकद हि आहे म्हणून महात्मा फुले बहुजनांना उद्देश करताना म्हणतात की 'शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही'. म्हणूनच पुण्यात बुधवारपेठेत भिडे यांच्या वाड्यात पहिली शाळा काढली. फुल्यांनी शिक्षणात भर का दिला हे समजून घ्यावयाचे असेल तर त्यांचे विचार सखोल अभ्यासले पाहिजेत. शिक्षणाची महती सांगताना असे म्हणतात की,

'विद्याविना मती गेली, माती विना गती गेली,
गतीविना नीती गेली, निती विना वित्त गेले,
वित्ता विना शूद्र खचले, एवढे अनर्थ एका अविध्येने केले.

या मुळेच ज्योतिबांनी बहुजनांना शिक्षण मिळावे म्हणून प्रयत्न सुरु केले.

**शाळा प्रवेश केंव्हा:-**

मुलांना शाळेत कधी घालावे याबद्दल फुल्यांची स्पष्ट विचारधारा होती. कन्या अथवा मुलगा थोडे थोडे बोलू लागताच त्यांना आईने लहान- लहान वाक्ये बोलावयास लावावे. तसेच मुळाक्षरे खेळता खेळता पाठ करावीत. पुढे पाचवे वर्ष लागताच त्यास शाळेत पाठविण्यास सुरुवात करावी. औद्योगिकरणामुळे व बहुतांश स्त्रिया नोकरदार असल्याने त्यांना घरी मुलांकडून असा अभ्यास करून घेणे शक्य नाही. शिशुवर्ग किंवा बालवाड्या यांच्या रूपाने ज्योतिबा फुले यांना अभिप्रेत असलेला विचारच अस्तीत्वात आला आहे.

**फुल्यांच्या मते शिक्षक कसा असावा:-**

महात्मा फुले यांची शिक्षकाद्दल काही अपेक्षा होत्या, त्यांना शिक्षक म्हणजेच मूर्तीघडविणारामूर्तिकार अशी अपेक्षा होती या अपेक्षेतुनच त्यांनी शिक्षकाबद्दलच्या कांही अपेक्षा मांडल्या आहेत त्या खालील प्रमाणे.

१. शिक्षक हा सर्व धर्म समभाव मानणारा असावा.
२. मुलगी-मुलगा यांना समान मानणारा असावा.
३. शूद्रादिशूद्रांना समजावून घेवून त्यांना शिक्षण देणारा असावा.
४. आपले सर्व विद्यार्थी उद्योगी कसे बनतील याला प्रोस्ताहान देणारा असावा.
५. जाती घर्माच्या पलीकडे जावून सर्व विद्यार्थ्यांमध्ये एकोपा निर्माण करणारा शिक्षक असावा.

**फुल्यांच्या मते शिक्षक कसा नसावा :-**

महात्मा फुले यांच्या शिक्षक कसा असावा याबद्दल जशा अपेक्षा होत्या तसेच शिक्षक कसा नसावा याबद्दलही त्यांच्या कांही कल्पना होत्या, त्या खालील प्रमाणे.

१) शिक्षक हा भाडोत्री नसावा.शिक्षक हा आपमतलबी व स्वार्थसाधू नसावा. शिक्षक कल्पित धर्माभिमानी नसावा.

२) आपल्या वर्गात असणा-या विद्यार्थ्यांबरोबर दुजाभाव करणारा नसावा.

३) कनिष्ठ वर्गीयांशी फटकून वागणारा शिक्षक नसावा.

**धार्मिक शिक्षणाबद्दल महात्मा फुल्यांचे विचार:-**

शिक्षका बरोबरच महात्मा फुल्यांनी शिक्षणाबद्दल आपले विचार मांडले आहेत. विशेषता धार्मिक शिक्षणाबद्दल महात्मा फुल्यांनी आपले मत मांडले आहे. फुले धर्मावर आधारीत शिक्षणाला विरोध करतात. त्या काळात शिक्षणतज्ञ व शिक्षण आयोग धार्मिक शिक्षणात आग्रह धरणारे होते. फुले म्हणतात धार्मिक शिक्षणामुळे जीवनविषयक दृष्टीकोण तयार होतो व त्यातून आचार विचाराची मुल्ये त्यातून मनावर बिंबवले जातात. भारतात विविध धर्मिय लोक रहात असल्याने आपलाच धर्म चांगला कसा असून इतरांचा वाईट कसा आहे असा दृष्टीकोण तयार होतो. महात्मा फुले यांना धार्मिक शिक्षणातून आणखी एक भिती वाटते ती म्हणजे अशा धार्मिक शिक्षणातून जातीव्यवस्था या घट्ट बनतात. म्हणूनच महात्मा फुले हे शिक्षणातून धर्म शिक्षण व धर्म संस्कार काढावे असा विचार स्पष्टपणे समाजापुढे मांडतात.

**अभ्यासक्रम कसा असावा याबद्दल फुल्यांचे विचार:-**

हंटर शिक्षण आयोगाला सादर केलेल्या निवेदनात क्रांतीबा फुले यांनी प्राथमिक शिक्षणाचा अभ्यासक्रम कसा असावा यासंदर्भात खालील विचार व्यक्त केलेले आहेत.

**१.** अभ्यासक्रमात मोडी, बाळबोध लेखनवाचन, हिशोबाची माहिती, सर्वसाधारण इतिहास, भूगोल, व्याकरण यांचे प्राथमिक ज्ञान, शेतकीचे प्राथमिक ज्ञान, तसेच नीती आणि आरोग्य या संबंधीचे सोपे धडे अंतर्भूत करावे.

२. यांत्रिकी,नीतिबोध, आरोग्य, शेतकी आणि उपयुक्त कला या विषयावरील पाठ या पुस्तकांमधून श्रेणीनुसार वाढत्या प्रमाणात देण्यात यावेत.

३. अभ्यासक्रमात इतर सर्व साधारण विषयांबरोबरच शेतकी आणि आरोग्य यांच्या मुलभूत ज्ञानाचा आंतरभाव केला पाहिजे.

**संदर्भ:-**

१. कटारे मोतीराम :- क्रांतीबा फुले चळवळ आणि तत्वज्ञान, सुगावा प्रकाशन पुणे, २०००,पृ.९

२. य.दी.फडके :- संपादक महात्मा फुले समग्र वाङःमय, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई,आकृती सहावी २००६. पृ.७६८

३. कटारे मोतीराम:- कित्ता पृ.११.

४. ऑम्व्हेटगेल:- जोतिबा फुले आणि स्त्री-मुक्तीचा विचार, सातवी आवृती २०१२.

५. कीर धनंजय:- महात्मा जोतीराव फुले,पॉप्यूलर प्रकाशन मुंबई.